# नियोजन आयोगाच्या सल्लागार समितीवर ७२ जणांची निवड

पुणे, २२ एप्रिल / प्रतिनिधी

बाराव्या पंचवार्षिक योजनेत प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षण, तंत्र व वैद्यकीय शिक्षणासंदर्भात कोणते धोरण आखले जावे यासाठी स्थापन करण्यात आलेल्या सल्लागार समितीवर महाराष्ट्रातील ७२ जणांची निवड करण्याची घोषणा नियोजन आयोगाचे सदस्य डॉ. नरेंद्र जाधव यांनी केली. या समितीत पुण्यातील ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य, ज्येष्ठ

## पुण्यातून माशेलकर, शेवगावकर, भाई वैद्य, पटवर्धन, एकबोटे, असिम सरोदे आदींचा समावेश

संशोधक डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्यासह विविध तज्ज्ञांचा समावेश करण्यात आला आहे.

विविध विषयांसाठी नियुक्त केलेल्या सल्लागार समितीच्या या सदस्यांनी पुढील वर्षभरात बाराव्या पंचवार्षिक योजनेचे स्वरूप कसे असावे याबाबत शिफारशी कराव्यात. तसेच त्यांच्या सूचनेतील काही सूचना विचारात घेतल्या जातील. धोरण तयार करताना त्यांच्या सूचना तसेच सल्ला विचारात घेतला जाईल. डॉ. नरेंद्र जाधव हे नियोजन आयोगाचे सदस्य असून त्यांच्याकडे प्राथमिक, माध्यमिक, उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण तसेच सामाजिक न्याय, कामगार कल्याण आणि युवक कल्याण आणि क्रीडा विभाग या चार विभागांच्या धोरण निर्मितीची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. या विभागासाठी बाराव्या पंचवार्षिक योजनेत एक एप्रिल २०१२ ते २०१७ या दरम्यानच्या कालावधीत कोणते धोरण आखले जावे यासाठी सल्लागार समितीची स्थापना आयोगाने केली आहे.

आयोगाच्या सल्लागार समितीवर महाराष्ट्रातील सर्वाधिक ७२ तज्ज्ञांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामध्ये ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य, ज्येष्ठ संशोधक डॉ. रघुनाथ माशेलकर, पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रघुनाथ शेवगावकर, सिंबायोसिस अभिमत विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. भूषण पटवर्धन, नांदेडच्या विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे, जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. के. बी. पाटील, डॉ. गजानन एकबोटे, विजय खरे, प्राचार्य ठकाजी कानवडे, रावसाहेब शिंदे, हरी अत्रे, हेरंब कुलकर्णी, प्रताप गायकवाड, नयना निमकर, वसुधा गर्दे, डॉ. संजय चाकणे, अ‍ॅड. असिम सरोदे, डॉ. मिलिंद भोई, डॉ. विनोद शहा यांची शिक्षण व इतर विभागांसाठी निवड केली. तर क्रीडासाठी कपील देव, दिलीप वेंगसरकर, मुंबईतील रमेश जोशी, डॉ. आनंद नाडकर्णी यांची सल्लागार समितीवर निवड करण्याची घोषणा डॉ. जाधव यांनी केली. ■

लोकसत्ता ~~२३/४~~ता. २३/४/२०११